# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १६/०३/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १६/०३/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग, अस्थापना विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

**विषय क्र.१ :- न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाईनगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत**

**विषय क्र.२ :- न.प. हद्दीत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे बाबत.**

**विषय क्र.३ :- गोवर्धन जगन ढोलकर सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती व रिक्त जागेवर नवीन नियुक्ती करण्या बाबत.**

---

**विषय क्र.१ :- न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाईनगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की न.प. हद्दीतील मंगल गेट ते रमाई नगर वस्तीला लागून नळगंगा नदीवर असलेला पूल हा बराच वर्ष जुना असून ठीक ठिकाणी खराब झाला असून त्याची उंची देखील अतिशय कमी आहे. त्यामुळे पावसाळ्यात नदीच्या पाण्याची पातळी वाढून पाणी सदर पुलावरून वाहत असते, तसेच मलकापूर बस स्टॅन्ड ते रमाई नगर पर्यंत नवीन रस्त्याचे काम करण्यात आल्याने याच भागातून वाहनांची व येणाऱ्या जाणाऱ्यांची सतत वर्दळ असल्याने पावसाळ्यात या भागातील व शहरातील इतर नागरिकांना दैनंदिन काम करिता सदर ठिकाणाहून रहदारी करणे कठीण जाते, वेळप्रसंगी नागरिकांना पुराच्या पाण्यातून रहदारी करावी लागते. परिणामी सदर परिस्थितीमुळे आजपर्यंत दोन-तीन जणांना पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने जीव गमवावे लागले आहे व भविष्यातही जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असल्याने त्या भागातील नागरिकांच्या नवीन पूल बांधकामा करिता अर्ज सुद्धा प्राप्त झालेले असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता मंगलगेट ते रमाईनगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.२ :- न.प. हद्दीत जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे बाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां. उपविभाग मलकापूर यांचे पत्र क्र १५३/तां/२०२३ दि ३०/०१/२०२३ चे पत्रानुसार त्यांनी खालील कामा करिता जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत काम करण्याचे नमूद केले आहे.

१)मलकापूर शहर जिल्हा बुलढाणा येथील शासकीय मोकळ्या जमिनीवर अतिक्रमण प्रतिबंध करण्यासाठी मधुमालती नगर मध्ये संरक्षण भिंत बांधकाम करणे

वरील सर्वबाबींचा विचार करता जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत येत असलेल्या सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे योजने अंतर्गत विकास काम करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.३:- गोवर्धन जगन ढोलकर सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती व रिक्त जागेवर नवीन नियुक्ती करण्या बाबत.**

वरील विषयास अनुसरून आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या अहवालावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते कि, श्री गोवर्धन जगन ढोलकर सफाई हे आरोग्य विभागात दि २/०९/१९९४ पासून सफाई कामगार म्हणून कार्यरत असून त्यांची २९ वर्ष ७ महिन्यांची सेवा पूर्ण झालेली असून त्यांनी दि ०१/०२/२०२३ रोजी स्वेच्छा सेवा निवृत्ती मिळणे बाबत अर्ज सदर केला आहे. त्यानुसार मा. आयुक्त तथा संचालक न. प. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र नपाप्रस/२००४ लाडकमिटी प्रक्र ११५/५-२६क - २४ दि.१०/०८/२००७ अन्वये तसेच मा. आयुक्त तथा संचालक यांचे परिपत्रक नपाप्रस/२०२२/सर्वन.प./विभागीय परीक्षा/प्र.क्र.४५ कक्ष-४/५४०५ दि २३/११/२०२२ नुसार सेवेत २० वर्षा पेक्षा जास्त सेवा झालेल्या सफाई कामगारांना स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजूर करण्यास तसेच सदर रिक्त होणार्या सफाई कामगार पदावर अर्जदार श्री गोवर्धन जगन ढोलकर यांचा मुलगा मोहन गोवर्धन ढोलकर यांना लाडकमेटी शिफारशी नुसार वारस हक्काने नियुक्ती मिळणेबाबत आरोग्य लिपीक, कार्यालय परीवेक्षक व उपमुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी अहवालात नमूद केले आसून त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता अर्जदार श्री गोवर्धन जगन ढोलकर यांना मा. आयुक्त तथा संचालक न. प. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र नपाप्रस/२००४ लाडकमिटी प्रक्र ११५/५-२६क - २४ दि.१०/०८/२००७ अन्वये तसेच मा. आयुक्त तथा संचालक यांचे परिपत्रक नपाप्रस/२०२२/सर्वन.प./विभागीय परीक्षा/प्र.क्र.४५ कक्ष-४/५४०५ दि २३/११/२०२२ नुसार सेवेचे २० वर्ष पूर्ण केल्याने स्वेच्छा सेवा निवृत्ती देण्यास व सदर रिक्त होणार्या सफाई कामगार पदावर अर्जदार श्री गोवर्धन जगन ढोलकर यांचा मुलगा मोहन गोवर्धन ढोलकर यांना लाडकमेटी शिफारशी नुसार वारस

हक्काने नियुक्ती साठी आवश्यक असलेले सर्व दस्त ऐवजांची पूर्तता केली असल्याने त्यांना नियुक्त करण्यास ही सभा मान्यता देत आहे

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर